पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१८/०९/२०२३
## दि.१७/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३१७/२०२३,भादविक ३९२,५०४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय २५ वर्षे,रा.भिमपुरा,लष्कर,कॅम्प,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १७/०९/२०२३ रोजी सकाळी ११/३०वा.गुडलक मटण शॉप,खेडेकर भाजी मार्केट जवळ खडकमाळ आळी,घोरपडे पेठ,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी हे काम करीत असलेल्या गुडलक मटण शॉप या दुकानात येऊन त्यांना शिवीगाळ करुन,सत्तुरचा धाक दाखवुन जीवे मारण्याचा प्रयत्न करुन,दुकानातील असलेल्या उघडया गल्ल्यातील १५,०००/- रुपये रोख रक्कम जबरी चोरी करुन घेवुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सोनवणे ९९२३६४०३०३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी-काळभोर पो स्टे ५८६/२०२३,भादविक ३०४(अ),३३७,३३८,२७९,४२७ मो.वा.का.क.१८४ |
| **फिर्यादी** | महादेव चोरगडे,वय ५३ वर्षे,रा.सर्वे नं.२२/२,गणेश चौक,आंबेगांव,पुणे |
| **आरोपीत** | मालवाहु टेम्पो वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०९/२०२३ रोजी सकाळी ०८/१५ वा. सासवडकडून लोणीकाळभोरकडे दिवेघाट मार्गे जात असतांना दिवे घाटातील तीस-या वळणांवर दिवेघाट सासवड ते हडपसर रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मालवाहु टेम्पो वाहन हे बेदरकारपणे,रस्त्याचे परीस्थीतीकडे दुर्लक्ष करून,हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन,नमुद ठिकाणी त्याचे वाहन पलटी करून,वाहनांतील मजुर कामगार छोटु दिल्लु कोल,वय-२५ वर्षे,रा.गोपालपुर,मध्य प्रदेश गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. तसेच वाहनांतील इतर १७ मजुरांना गंभीर व किरकोळ दुखापत करून,वाहनाचे नुकसानीस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. खैरनार ८१०८७७२६२६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे २८५/२०२३,भादविक ४३५,४२७ |
| **फिर्यादी** | जितेंद्र यादव,वय २६ वर्षे,रा.गल्ली नं.१२,जनता वसाहत पर्वती,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिं.१७/०९/२०२३ रोजी रात्री ०२/०० वा. सुमारास जनता चौक,पर्वती,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे रिक्षा चालक असुन,त्यांनी नमुद ठिकाणी पार्क केलेली ॲटो रिक्षा कोणीतरी अज्ञात इसमाने,अज्ञात कारणावरुन त्यांची रिक्षा पेटवुन दिली. सदर आगीमुळे फिर्यादी तसेच इतर रिक्षा यांचे एकुण १,११,०००/- रुपये किचे नुकसान केले आहें. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, जी.डी.घावटे ९५९४६१५५३३ |

## दि.१८/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्ह

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १४०६/२०२३,भादविक ३०२,३४,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | विठ्ठल झोंबार्डे,वय ४६ वर्षे,रा.मिरेकर वस्ती,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर पाच साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १७/०९/२०२३ रोजी रात्री १०/०० वा.शंकरमठ सर्वे नं.१५२ ए,मिरेकर वस्ती,हडपसर,पुणे येथे असलेल्या सार्वजनिक शौचालयावर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा स्वप्नील विठ्ठल झोंबार्डे,वय-१७ वर्षे,रा.शंकरमठ सर्वे नं.१५२,ए, मिरेकर वस्ती,हडपसर,पुणे यास यातील नमुद इसम व त्याचे इतर साथीदार यांनी संगनमत करुन,पुर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन,स्वप्नील यास जीवे ठार मारण्याच्या उददेशाने त्यांचेकडील धारदार लोखंडी हत्याराने त्याचे डोक्यावर वार करुन,त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार केले आहे. तसेच त्यांचेकडील लोखंडी धारदार हत्यारे हवेत फिरवुन,आमच्या सोबत कोणी पंगा घेतलातर असाच एका-एकाचा मुडदा पाडु असे जोर-जोरात बोलुन परीसरात दहशत पसरवली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, दोरकर ९८९२५५५८८१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**